Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानातील किशोरी उत्कर्ष मंच

**श्रीमती ज्योत्स्ना गजेंद्र मैंदाड**
संशोधिका

**डॉ. महेश गं. कळलावे**
मार्गदर्शक - सहाय्यक प्राध्यापक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
उपपरिसर उस्मानाबाद.

**प्रस्ताविक :**

सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले आहे. तेंव्हा प्राथमिक शिक्षणाच्या नंतरचा महत्वाचा टप्पा म्हणून माध्यमिक शिक्षणाकडे पाहिले जाते. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, गुणवत्ता वाढ व माध्यमिक शिक्षणाची समान संधी या उद्दिष्टांवर आधारित भारत सरकारच्या मानव विकास मंत्रालये व राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने माध्यमिक शिक्षणाच्या विकासासाठी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान हे 2009-10 या वर्षापासून सुरू केले आहे.

माध्यमिक शिक्षणाचे सर्वात्रिकीकरण करत असताना शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांकडे लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. त्यामध्ये वंचित घटकांमध्ये मुलींच्या शिक्षणापासून वंचित राहण्याची कारणे व प्रमाण याचा विचार करता माध्यमिक स्तरावर फक्त जिल्हा परिषदेच्या प्रशालेमधून किशोरी उत्कर्ष मंच हा उपक्रम राबवला जातो आणि त्यामुळे मुलींचे शिक्षण प्रवाहात टिकूण राहण्याचे प्रमाण वाढले असून त्याचा माध्यमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी उपयोग होतो.

**किशोरी उत्कर्ष मंचाची आवश्यकता :**

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले तरीही मुली व मुलांच्या शिक्षणात मोठी तफावत आढळते. 86 व्या घटनादुरूस्तीने 14 वर्षे वयापर्यंतच्या प्रत्येक मुलामुलींना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याबाबत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे. परंतू समाजामध्ये म्हणजेच भारतीय समाजामध्ये अर्थात भारतातील प्रत्येक घटक राज्यांमध्ये पालक व समाज मुलांच्या शिक्षणाला जेवढे अनुकूल आहे तितके मुलींच्या शिक्षणाला अनुकूल नाही.

जनगणना 2001 नुसार मुलींच्या साक्षरतेचे प्रमाण 75.46 टक्के इतके आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व किशोरी उत्कर्ष मंच 2009-10 मध्ये सुरू झाल्यामुळे यामध्ये 2011 च्या जणगणनेचा विचार न करता 2001 च्या जनगणनेची आकडेवारी घेतली आहे. ग्रामीण व शहरी भागाचे प्रमाण 67.43 टक्के व 85.44 टक्के एवढे आहे. त्यात माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण 54 टक्के एवढे आहे. मुलींच्या गळतीचे प्रमाण हे 5.5 टक्के एवढे आहे. अद्याप कितीही उपाय योजना केल्या तरी शासनाला किंवा शालेय शिक्षण विभागाला मुलींची 100 टक्के गळती रोखणे शक्य झालेले नाही. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, गुणवत्तावाद व माध्यमिक शिक्षणाची समान संधी या उद्दिष्टांवर आधारित आणि महाराष्ट्रातील सद्यस्थितीतील मुलींच्या शिक्षणामध्ये गुणवत्तापुर्ण सुधारणा करण्यासाठी किशोरी उत्कर्ष मंचाची आवश्यकता आहे.

**किशोरी उत्कर्ष मंचाची उद्दिष्ट्ये :**

1. माध्यमिक शाळांमधील मुलींची पटनोंदणी 100 टक्के पर्यंत वाढविणे.
2. माध्यमिक शाळांमध्ये दाखल झालेल्या मुलींची गळती व स्थगितीसाठी उपाय योजना करणे.
3. माध्यमिक शाळांमधील लिंगसमभाव वाढविणे.
4. विविध आनंददायी उपक्रमातून मुलींमध्ये आत्मविश्वास व अन्य जीवन कौशल्य विकसित करून व्यक्तीमत्व विकास साधणे.
5. किशोरवयीन, मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या समस्या शोधून त्यावर उपाय योजना करणे.

**किशोरी उत्कर्ष मंच संरचना :**

किशोरी उत्कर्ष मंचाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य करून मंच जास्तीत जास्त यशस्वीपणे राबवण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळावर असते या कार्यकारी मंडळाची संरचना खालील प्रमाणे आहे.

**कार्यकारी मंडळ संरचना**

| अ.क्र | पद | प्रतिनिधी | संख्या |
|---|---|---|---|
| 1 | अध्यक्ष | महिला लोकप्रतिनिधी | 01 |
| 2 | उपाध्यक्ष | महिला लोकप्रतिनिधी | 01 |
| 3 | सदस्य (मुख्याध्यापक) | संबधित माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक | 01 (प्रत्येक शाळेतून) |
| 4 | सदस्य (शिक्षिका) | संबधिक माध्यमिक शाळेतील शिक्षिका | 01 (प्रत्येक शाळेतून) |
| 5 | सदस्य (शिक्षक) | संबधित शाळेतील शिक्षक | 01 (प्रत्येक शाळेतून) |
| 6 | सदस्य - पालक प्रतिनिधी | शाळेतील इयत्ता निहाय पुरुष व महिला पालक | इयत्ते नुसार |
| 7 | सदस्य - अंगणवाडी कार्यकर्ती | संबंधित क्षेत्रातील सर्व अंगणवाडी कार्यकर्त्या | अंगणवाडी नुसार |
| 8 | सदस्य - विद्यार्थिनी प्रतिनिधी | इयत्ता 9 वी व इयत्ता 10 वी मधून | प्रत्येक शाळेतून |
| 9 | सदस्य - प्राथमिक आरोग्य केंद्र | प्राथमिक आरोग्य केंद्रातील ए.एन.एम. | प्रा. आ. केंद्र अथवा उपकेंद्र मधील ए.एन.एम. |
| 10 | सदस्य - माजी विद्यार्थिनी | मागील 5 वर्गातील माजी विद्यार्थिनी | प्रत्येक शाळेतून किमान दोन |
| 11 | सदस्य - गावातील महिला | परिसरातील उच्च शिक्षित महिला डॉक्टर, वकिल, इंजिनिअर, अधिकारी अथवा गृहिणी यापैकी | 05 |
| 12 | सदस्य - पर्यवेक्षिका, आय.सी.डी.एस | एकात्मिक बाल विकास योजना कार्यालय संबंधित प्रकल्पातून देणे | 05 |
| 13 | सदस्य - स्वयंसेवी संस्था | संबंधित क्षेत्रातील स्वयंसेवा संस्थाचे प्रतिनिधी | आवश्यकते नुसार |
| 14 | सदस्य सचिव - वरिष्ठ महिला शिक्षिका | माध्यमिक शाळेतील अनुभवी शिक्षिका | 01 (प्रत्येक शाळेतून) |

**मंचाच्या सदस्याची निवड करताना खालील बाबींची दक्षता घ्यावी.**

1. सदर कार्यकारिणीमध्ये असणाऱ्या विद्यार्थिनी प्रतिनिधींचे आई / वडील हे पालक असू नयेत.
2. कार्यकारी मंडळ हे फक्त एका वर्षासाठीच असेल. दरवर्षी कार्यकारी मंडळ नव्याने गठीत करून नवनवीन सदस्यांना संधी द्यावी. संबंधित वार्ड अथवा गावातील शासकीय कर्मचारी हे पदसिध्द सदस्य असतात.
3. स्थानिक परिस्थितीनुसार कार्यकारी मंडळातील सदस्य संख्येत बदल करण्याचे अधिकार हे शाळा व्यवस्थापन व विकास समितीकडे राहतात.

**कार्यकारी मंडळ कार्यपध्दती :**

वरील निकषानुसार कार्यकारी मंडळाची निवड केल्यानंतर मंचाला प्रभावीपणे वाढवून मुलींसाठी मंच जास्तीतजास्त उपयुक्त व्हावा म्हणून प्रयत्न व्हावा म्हणून मंडळाची कार्यपध्दती खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.

**कार्यकारी मंडळाच्या बैठकांचे आयोजन :**

**अ) वार्षिक बैठक :** वार्षिक बैठक ही शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी आयोजित करण्यात यावी. या बैठकीची विषय पत्रीका पुढीलप्रमाणे असते.

1. किशोरी उत्कर्ष मंचाच्या स्थापनेचा उद्देश, त्याचे स्वरूप व कार्यवाही विषयी सर्व सदस्यांना महिती देणे.
2. किशोरींच्या विकासाच्या दृष्टीने कार्यकारी मंडळातील सदस्यांच्या कामाचे स्वरूप व जबाबदारीची माहिती देणे.
3. संबंधित माध्यमिक शाळेतील मुलींची अनुपस्थिती गळती व स्थगितीची कारणे जाणून घेवून उपायोजनात्मक कार्यक्रम ठरविणे.
4. किशोरी विकासाच्या दृष्टीने आवश्यक अशा स्थानिक गरजेनुसार अन्य विषय, उपक्रमांचे वेळापत्रक ठरविणे.

**आ) मासिक बैठक :**

1. मासिक बैठकांचे आयोजन अध्यक्षाच्या परवानगीने सदस्य सचिव करतात.
2. ही बैठक प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात येते.
3. बैठकीची सूचना सर्व सदस्यांना किमान 10 दिवस अगोदर लेखी कळविण्यात येते.
4. बैठकीचे आयोजन सरकारी व सार्वजनिक सुट्टी गावचा बाजार दिवस, सण, उत्सव, सोडून करण्यात येते.
5. बैठकीमध्ये वार्षिक कार्यक्रम निश्चित केल्याप्रमाणे दरमहा आयोजित करावयाच्या कार्यक्रमाविषयी चर्चा केली जाते.
6. प्रत्येक मासिक बैठकीत मागील महिन्याच्या बैठकीचा आढावा घेऊन प्रभावी अंमलबजावणीसाठी चर्चा व उपाय शोधले जातात.

पहिल्या बैठकीत मंचाचे सदस्य, शाळा सोडलेल्या मुली त्यांचे पालक यांना उपस्थित राहण्यास कळवले जाते. तसेच गावातील शाळा सोडून दुसऱ्या शाळेत जाणाऱ्या मुलींच्या पालकांनाही बोलावले जाते आणि मिळविलेल्या पायाभूत माहिती नुसार बैठकीमध्ये चर्चा केली जाते. कायम स्वरूपी शाळा सोडणाऱ्या मुलींच्याबाबात पालकांशी व मुलींशी चर्चा करून त्यांचे व्यक्तिगत प्रश्न जाणून घेवून उपाय शोधले जातात. शाळा सोडून दुसऱ्या शाळेत जाणाऱ्या मुली अन्य शाळेत दाखल झाल्याची संबंधित शाळा व पालकांकडून खात्री करून घेतली जाते. तसेच अन्य शाळेतून नव्याने प्रवेश घेतलेल्या मुलींशी चर्चा करून समस्या जाणून घेतल्या जातात.

**किशोरी उत्कर्ष मंचाचे सनियंत्रण व मूल्यमापन :**

किशोरी उत्कर्ष मंचाची उद्दिष्टे साध्य करण्याकरता किशोरी उत्कर्ष मंचाच्या अंतर्गत अपेक्षित कार्यक्रमांचे सनियंत्रण आणि मूल्यमापन सक्षमपणे होण्याकरिता खालील प्रमाणे संबंधित घटकांच्या भूमिका स्पष्ट करता येतात.

**मुख्याध्यापक :** मुख्याध्यापकाचे सनियंत्रण तंत्र व जबाबदारी खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

1. शाळा स्तरावरील जून मधील पहिली बैठक व उर्वरित 10 महिन्याच्या बैठकांचे इतिवृत्त सदस्य सचिवांच्या साह्याने स्वतंत्र नोंदवहीमध्ये अद्यावत ठेवणे.
2. इतिवृत्तानुसार कार्यवाहीचा पाठपुरावा करणे.

**विस्तार अधिकारी :** विस्तार अधिकारी यांची जबाबदारी व सनियंत्रण तंत्र खालील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

1. मुख्याध्यापक आणि सदस्य सचिव यांच्याशी चर्चा करणे.
2. दाखल झालेल्या मुली या शाळा सोडून जावू नये यासाठी निवडण्यात आलेले उपक्रम आणि हे उपक्रम राबविण्यात येणाऱ्या अडचणी संबंधी मंचाच्या सदस्यांना मागदर्शन करून उपाय सुचविणे.
3. शाळेच्या परिसरातील सर्व मुली शाळेत येतात की नाही हे तपासणे.
4. शाळेतून मुलींची गळती होते का हे तपासणे.
5. इतिवृत्तामधील आलेले विषय व त्यावर करण्यात आलेले उपाययोजना तपासणे.
6. विभागातील जिल्ह्यातील सर्व सदस्य सचिव यांची बैठक घेऊन अभिप्राय घेणे.

**गटशिक्षणाधिकारी :** गटशिक्षणाधिकारी यांची सनियंत्रण तंत्र आणि जबाबदारी खालील प्रमाणे स्पष्ट करता येते.

1. मुख्याध्यापक आणि सदस्य सचिव यांच्याशी चर्चा करणे.
2. शाळेत दाखल मुलींचे प्रमाण तपासणे.
3. दाखल झालेल्या मुली या शाळा सोडून जावू नये यासाठी निवडण्यात आलेले उपक्रम आणि हे उपक्रम राबवण्यात येणाऱ्या अडचणी संबंधी मंचाच्या सदस्यांना मार्गदर्शन करून उपाय सुचविणे.
4. किशोरी उत्कर्ष मंचाच्या बैठकांचे इतिवृत्तातील मुद्यांवर संबंधिताशी चर्चा करणे आणि आवश्यक तिथे सहाय्य करणे.
5. शाळेच्या परिसरातील सर्व मुली शाळेत येतात की नाही हे तपासणे.
6. शाळेतून मुलींची गळती होते का हे तपासणे.
7. इतिवृत्तामधील आलेले विषय व त्यावर करण्यात आलेल्या उपाययोजना तपासणे.

8. विभागातीला जिल्हातील सर्व सदस्य सचिव यांची बैठक घेऊन अभिप्राय घेणे.

**विभागीय कार्यालय आरएमएसए (नागपूर, मुंबई, औरंगाबाद, पुणे) :**

विभागीय कार्यालया मार्फत केले जाणारे सनियंत्रण व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे स्पष्ट होतात.

1) शाळेच्या परिसरातील सर्व मुली शाळेत येतात की नाही ते तपासणे.
2) शाळेतून मुलींची गळती होते का हे तपासणे.
3) इतिवृत्तामधील आलेले विषय व त्यावर करण्यात आलेल्या उपाययोजना तपासणे.
4) विभागातील / जिल्ह्यातील सर्व सदस्य सचिव यांची बैठक घेऊन अभिप्राय घेणे.

**उपशिक्षणाधिकारी आरएमएसए :**

1) शाळेच्या परिसरातील सर्व मुली सोबत शाळेत येतात की नाही हे तपासणे.
2) शाळेतून मुलींची गळती होते का हे तपासणे.
3) इतिवृत्तामधील आलेले विषय व त्यावर करण्यात आलेल्या उपाययोजना तपासणे आणि आवश्यक तिथे मार्गदर्शन करणे.
4) सदस्य सचिव यांची बैठक घेऊन अभिप्राय घेणे.

**शिक्षणाधिकारी :**

1) शाळेच्या परिसरातील सर्व मुली शाळेत येतात की नाही हे तपासणे.
2) शाळेतुन मुलीची गळती होते का हे तपासणे.
3) इतिवृत्तामधील आलेले विषव व त्यावर करण्यात आलेल्या उपाययोजना तपासणे.
4) सदस्य सचिव यांची बैठक घेऊन अभिप्राय घेणे.

**सल्लागार (आरएमएसए) :**

1) सनियंत्रणाबाबत जबाबदारी दिलेल्या संबंधितानी कोणती कार्यवाही केली पाहिजे.
2) किशोरी उत्कर्ष मंचाच्या कार्यपध्दतीमध्ये आवश्यकता असल्यास सुधारणा सुचविणे जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन किशोरी उत्कर्ष मंचासंबंधी आढावा घेणे.

**समारोप :**

अशाप्रकारे आरएमएसए च्या मार्फत चालवणारा मुलींच्या समस्यांकडे लक्ष केंद्रीत करून माध्यमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातील महत्वाचा घटक म्हणजे मुलींचे शिक्षण याविषयी तत्परतेने कार्य करणारा किशोरी उत्कर्ष मंच योग्य रीतीने व उद्दिष्टांच्या परीपूर्ततेच्या हेतूने शाळा स्तरापासून विभाग व राज्य स्तरापर्यंत योग्य सनियंत्रण / करून चालवला गेला तर माध्यमिक स्तरावरील मुलीच्या शिक्षणासाठी संजीवणी ठरणार आहे.

**संदर्भ सूची :**

1. Sharma, S. R. (2003). Educational Research. New Delhi : Anmol Publication Pvt. Ltd.
2. मुळे, रा. शि., उमाठे, वि. तु. (1998). शैक्षक्षिक संशोधनाची मूलतत्वे. नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ.
3. वायदंडे, शशिकांत (2009). किशोरी उत्कर्ष मंच कार्यात्मक मार्गदर्शिका. पुणे : यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा).

**वेबसाईट**

1. www.yashada.org/utkarsh